शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या स्वीयेतर सेवेतील प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तींच्या आदेशांचे स्वरूप सुस्पष्ट करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक: स्वीयेसे-१०८९/प्रक्र.३७/सेवा-२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ५ एप्रिल, १९८९.

CR1989040501

## परिपत्रक

शासकीय कर्मचारी/अधिकारी यांची राज्यांतर्गत स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्तीवर बदली/नियुक्ती करावयाच्या प्रकरणी त्यांच्या प्रतिनियुक्तीचे आदेश, महाराष्ट्र नागरी सेवा [पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने] नियम, १९८१ मधील नियम ४०, पोट नियम [४] अन्वये, परिशिष्ट-दोन मध्ये विहीत केलेल्या प्रमाण अटी व शर्तींच्या अधीन राहून, मंत्रालयाचे संबंधीत प्रशासकीय विभाग/विभाग प्रमुख यांनी, नियमावलीच्या परिशिष्ट-एक व शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: स्वीयेसे-१०८५/८५३/सेवा-८, दिनांक १८ जुलै १९८५ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, निर्गमित करावयाचे असतात.

२. वर उल्लेख केलेल्या दिनांक १८ जुलै १९८५ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागांना अधिकार प्रदान करण्यात आले असल्याने वरील नियमावलीच्या परिशिष्ट-दोन मधील अटी व शर्तींच्या तसेच परिशिष्ट-तीन मधील मार्गदर्शक सूचनांच्या चौकटीत बसणारी प्रकरणे सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभागांकडे संदर्भित करण्याची आवश्यकता नाही. प्रत्यक्षात मात्र प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर संबंधित विभाग करीत नसल्याचे व प्रत्येक प्रकरण परिपाठ म्हणून सामान्य प्रशासन विभागामार्फत वित्त विभागाकडे संदर्भित केले जात असल्याचे या विभागाच्या निदर्शनास आले आहे. पर्यायाने, वरीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यामागील हेतू सफल झालेला नाही आणि परिणामी सामान्य प्रशासन विभागाच्या व वित्त विभागाच्या कामात अनावश्यक वाढ झाली आहे, हे टाळण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा पूर्णपणे वापर करण्याची काळजी भविष्यकाळात घ्यावी व वित्त विभागाकडे सरसकट प्रत्येक प्रकरणी संदर्भ करण्याचे टाळावे.

३. वित्त विभागाच्या असेही निदर्शनास आले आहे की, संबंधित प्रकरणी आदेशांचे प्रारूप तयार करताना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती/प्रतिनियुक्तीचा कालावधी/प्रतिनियुक्ती भत्ता/प्रपत्र पदोन्नती इत्यादी विविध बाबतीत विभागांकडून आवश्यक काळजी घेतली जात नाही व उपरोल्लिखित नियमावलीच्या परिशिष्टांतील प्रमाण अटी, शर्तींचे/मार्गदर्शक सूचनांचे विभागांकडून पालन केले जात नाही. मंत्रालयीन विभागांकडून वित्त विभागात प्राप्त होणाऱ्या प्रकरणांच्या तपासणीच्या ओघात सर्वसाधारणपणे आढळून येणाऱ्या त्रुटी/उणिवा पुढे नमूद केल्या आहेत. वरील परिच्छेदांत उल्लेखिल्याप्रमाणे आपल्या अधिकारांचा वापर करून आदेश निर्गमित करताना मंत्रालयीन विभाग/विभाग प्रमुख यांनी ते नियमावलीच्या परिशिष्ट-दोन मध्ये विहीत केलेल्या प्रमाण अटी व शर्तींच्या आणि परिशिष्ट तीन मधील मार्गदर्शक सूचनांच्या चौकटीतच आहेत याची खात्री करून घेणे आणि पुढे नमूद केलेल्या व इतर संभाव्य चुका टाळणे आवश्यक आहे, ही बाब त्यांच्या निदर्शनास या परिपत्राद्वारे आणण्यात येत आहे :-

<u>अट क्रमांक[१] प्रतिनियुक्तीचा कालावधी</u> - याबाबतच्या तरतुदी परिशिष्ट-तीन मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक [१] व [२] येथील तरतुदींबरोबर एकत्रित विचारात घ्यावयाच्या आहेत. शासकीय कर्मचा-याला स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्तीवर जास्तीत जास्त चार वर्षे रहाता येते. अपवादात्मक प्रकरणी त्याहून अधिक मुदतवाढ, मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता घेऊन नंतरच देण्यात येते. [त्या वाढीव काळात प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय नसतो.] परंतु या विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, संबंधित मंत्रालयीन विभाग कर्मचा-याला चार वर्षे मुदत संपताच त्वरीत प्रत्यावर्तित करण्याबाबतची कार्यवाही वेळीच सुरु करीत नाहीत व पर्यायाने संबंधित कर्मचारी चार वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर रहातो. या मुदतवाढीसाठी मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता घेण्यात आलेली नसते व चार वर्षानंतर कर्मचा-याला प्रत्यावर्तित करण्यात आल्यानंतर चार वर्षांवरील प्रतिनियुक्तीचा कालावधी नियमित करण्याबाबत संबंधित विभाग प्रस्ताव सादर करतो व सदर प्रस्तावाला अनुमती देण्याशिवाय गत्यंतर रहात नाही. या पळवाटेचा फायदा उठविला जातो. त्यामुळे नियमांचे काटेकोरपणे पालन होत नाही, उलट ते मोडले जातात.

<u>अट क्रमांक [२] वेतन</u> - ज्या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात येते त्या पदाच्या वेतनमानातील किमान वेतन आणि कर्मचा-याने धारण केलेल्या पदाच्या वेतनमानातील त्याचे मूळ वेतन लक्षात घेऊन शेवटच्या परिच्छेदाचा अटी व शर्तीत अंतर्भाव करणे आवश्यक आहे, किंवा कसे ते तपासून त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. थोडक्यात, विवक्षित प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेऊन ही अट पूर्णपणे विचारात घेऊनच संबंधित कर्मचा-याचे वेतन ठरविणे आवश्यक आहे. परंतु विभागांकडून तसे केले जात नाही. एवढेच नव्हे तर दोन्ही पदांची वेतनमाने व कर्मचा-याचे मूळ वेतन इत्यादी बाबतचा तपशीलही उपलब्ध करुन दिलेला नसतो.

<u>अट क्रमांक [३] महागाई भत्ता</u> - शासकीय कर्मचा-यास राज्य शासनाकडील आपले वेतनमान किंवा स्वीयेतर सेवेतील पदाशी संलग्न असणा-या वेतनमानातील वेतन स्वीकारता येते. कर्मचा-यानी जर शासनाकडील वेतनमानातील वेतन स्वीकारले तर शासनाच्या नियमानुसार त्यावर देय असलेला महागाई भत्ता मिळेल. जर त्यानी स्वीयेतर सेवेतील वेतनमानातील वेतन स्वीकारले तर त्याला स्वीयेतर नियोक्त्याकडे नियमानुसार देय असलेला महागाई भत्ता मिळेल. म्हणजेच, दोन्ही बाबी एकमेकांशी निगडीत असताना तसा विचार विभागांकडून केला जात नाही.

<u>अट क्रमांक [११] रजा वेतन आणि निवृत्तीवेतन अंशदाने</u> - स्वीयेतर नियोक्त्यानी द्यावयाचे रजा वेतन अंशदान व निवृत्तीवेतन अंशदान यांच्या रकमांचा उल्लेख केला जात नाही. प्रस्तावित आदेशात या रकमांचा प्रकर्षाने उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच या रकमा जमा करण्याची जुनीच लेखाशीर्षे प्रस्तावित आदेशात नमूद केली जातात. रजा वेतन अंशदान, निवृत्तीवेतन अंशदान जमा करण्याची पुढे उल्लेखिलेली सुधारीत लेखा शीर्षे आदेशात नमूद करणे आवश्यक आहे :-

<u>रजा वेतन अंशदान</u> - ज्या सेवा लेखाशिर्षाखाली अधिका-याचे/कर्मचा-याचे वेतन खर्ची टाकले जाते, त्या सेवा लेखा शीर्षाला अनुरूप असे जमा शीर्ष नमूद करावे किंवा जेव्हा त्या प्रधान शीर्षाखाली अनुरूप असे कोणतेही जमा शीर्ष नसेल तेव्हा, "००७०- इतर प्रशासकीय सेवा-६०, इतर सेवा-८००-इतर जमा रकमा [नऊ] रजा वेतन अंशदाने" हे शीर्ष नमूद करावे.

निवृत्तीवेतन अंशदान - "००७१, निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ यांच्या वसुली संबंधातील अंशदाने व वसुलीच्या रकमा-०१-नागरी-१०१ अभिदाने व अंशदाने [एक]-स्वीयेतर सेवेतील अधिकारी."

अट क्रमांक [१७] बोनस / सानुग्रह प्रदान - या प्रमाण अटीत व त्याखालील टीप-२ व ३ मध्ये नमूद केलेल्या रु७५०/- व रु. १६००/- या आर्थिक मर्यादा अनुक्रमे रु. १६००/- व रु. २५००/- अशा सुधारित झाल्या आहेत. नियमावलीला औपचारिक दुरुस्ती करण्याची कार्यवाही चालू असून तिला काही कालावधी लागणे अपरिहार्य आहे. परंतु या सुधारित आर्थिक मर्यादा सर्वांना ज्ञात असून देखील विभागांकडून तयार करण्यात येणा-या आदेशात त्याच रकमा नमूद केल्या जातात.

अट क्रमांक [१८] प्रपत्र बढती - प्रतिनियुक्तीवर असताना मूळ विभागात कर्मचा-याची बढती होण्याची वेळ आली असेल तर सर्वसाधारणपणे प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवावयाची नसते, म्हणजेच त्याला प्रत्यावर्तित करणे आवश्यक असते. परंतु, अपवादात्मक प्रकरणी सक्षम अधिका-याने त्याची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवली तर प्रतिनियुक्ती भत्ता न देता निकट-निम्नता नियमानुसार बढतीच्या पदाचे वेतन मंजूर करता येते. मात्र यानुसार निकट-निम्नता नियमाचा लाभ सहा महिन्यानंतर अनुज्ञेय नसतो. या विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्रतिनियुक्तीवर असताना कर्मचा-यास मूळ विभागात बढती दिल्यानंतर त्वरीत किंवा अपवादात्मक प्रकरणी सहा महीने पूर्ण होण्यापूर्वी सुध्दा प्रत्यावर्तित करण्याच्या अटीचे काटेकोरपणे पालन केले जात नाही. प्रपत्र बढतीचा लाभ संबंधित कर्मचा-यास सहा महिन्या-नंतर अनुज्ञेय नसल्याने पुढे उद्‌भवणा-या परिस्थितीला कर्मचा-याला तोंड द्यावे लागते. ते टाळण्यासाठी प्रपत्र बढती संबंधीच्या अटीचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची विशेष काळजी विभागानी घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावित अट क्रमांक [२०] गट विमा योजना - शासनाने १९८२ पासून नव्याने अंगिकृत केलेल्या गट विमा योजनेबाबतचा उल्लेख विभागांकडून प्रस्तावित आदेशात केला जात नाही. सदर अट नियमावलीत अंतर्भूत करण्याची कार्यवाही चालू असून तिला काही कालावधी लागणे अपरिहार्य आहे. परंतु, या योजनेखाली स्वीयेतर नियोक्त्याने शासनाकडे वर्गणीची रक्कम जमा करणे आवश्यक असल्याने मासिक वेतनातून गट विमा योजनेची योग्य ती वर्गणी [रु. अमूक अमूक] वसूल करून ती लेखा शीर्ष "८०११, विमा व निवृत्तीवेतन निधी-१०६ इतर विमा व निवृत्तीवेतन निधी-१-महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचा-यांची गट विमा योजना" खाली स्वीयेतर नियोक्ता जमा करील, अशा आशयाच्या अटीचा अंतर्भाव विभागांनी प्रस्तावित आदेशात करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. ल. राईलकर,
शासनाचे अवर सचिव, वित्त विभाग.

एच-५८[२५००+५०-४-८९]-२

प्रत रवाना :-

१. महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
२. महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
३. महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
८. राज्यपालांचे सचिव,
९. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
१०. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
११. मंत्रालयातील सर्व विभाग,
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख,
* १४. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* १५. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* १६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* १७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* १८. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१९. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२०. जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
२१. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
२२. निवड फाईल, कार्यासन सेवा-२.

* पत्राद्वारे.

*****************

क्र. आस्थापना-८४/५०३३/ई-५/८९
पुणे दि. २३ 23 AUG 1989

प्रत कार्यासन अधिकारी-ई-2 यांना सस्नेह रवाना.

[signature] २३/८/८९
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म. रा.), पुणे
यांचे करिता

२०६४

...आदेशाच्या दिनांकापासून दहा दिवसात कळविण्यात यावेत. हा संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन, ... अधिकारी त्याच्या